| Publication – Gavkari | Page No - 15 |
|---|---|

# रबर एक्स्पोचे पुढील वर्षी आयोजन

■ मुंबई । दि.४ प्रतिनिधी

इंडिया रबर एक्स्पो(आयआरइ)चे १०वे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन बाँबे एक्झिबिशन सेंटरमध्ये आयोजित केली जाणार असून ते विकास, आद-नप्रदान आणि सहयोगासाठी उत्तम मंच ठरणार आहे. या आघाडीच्या कार्यक्रमाचे आयोजन ऑल इंडिया रबर इंडस्ट्रिज असोसिएशनमार्फत होणार आहे.

इंडिया रबर एक्सपो २०१९ आंतरराष्ट्रीय मानकांना पूर्ण करण्याकडे, जगभरातील औद्योगिक व्यावसायिकांचे इंडिया रबर एक्स्पो, मुंबई येथे स्वागत करण्यासाठी सज्ज आहे. भारतीय कंपन्यांना आंतरराष्ट्रीय कंपन्यांची भेट घेण्यासाठी आणि त्यांच्यासोबत सहयोग करण्यासाठी आगळावेगळा मंच मिळत आहे. विकसित होणाऱ्या रबर उद्योगाचा अंगभूत भाग म्हणून आयआरइ रबर उद्योगातल्या भारताच्या दुसऱ्या सर्वात जलदगतीने प्रगती करणाऱ्या अर्थकारणाचे स्पष्ट निदर्शक आहे. आयआरइ रबर उद्योगातल्या अत्याधुनिक तांत्रिक प्रगतींचे प्रदर्शन करेल आणि आरँएँडडी व दर्जा नियंत्रणाच्या बाजारपेठेतील सद्य स्थिती, सुविधा आणि सेवांबद्दल माहिती देणार आहे. रबर उद्योगासंबंधीच्या शासनाच्या बदलत्या नियमांबद्दल आणि नियंत्रणाबद्दल सूचना मिळत राहण्याची ही एक चांगली संधी असेल.